**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ५३/२०१८-१९/ 58 दिनांक: 27/03/2019

**आदेश केस क्र. ५३ (२०१८-२०१९)**

श्री संदेश रमेश पवार
सी.एस. क्रमांक २८० अ जुना बुधगांव
वखार भाग सांगली — **अर्जदार**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली — **पक्षकार**

२) कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
शहर विभाग सांगली

३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उप विभाग मध्य सांगली

**कोरम:-**१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. एन.के. ताडे, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**आदेश**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे. प्रस्तुत प्रकरण तक्रारदारांनी त्यांच्या २८०/अ जुना बुधगांव रोड वखार भाग सांगली येथील दुकान गाळा क्र.२ मध्ये शुध्द पेय जल प्रकल्पाकरिता LT-Supply 3 phase commercial connection 7.18 KV भाराचा वीज पुरवठा देण्याचे आदेश होण्याकरिता दाखल केलेले आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

२) थोडक्यात हकीकत अशी की, तक्रारदाराने दिनांक १६.०३.२०१८ रोजी, अतिरिक्त कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्या. सांगली सांगली शहर विभाग कार्यालय सांगली येथे वर नमूद वर्णनाचा विद्युत पुरवठा मिळणे कामी अर्ज केलेला होता. तथापि घर क्र. २८०/A जुना बुधगांव रोड वखार भाग सांगली या ठिकाणी असलेल्या इमारतीमध्ये दोन दुकान गाळे असून त्यातील एका गाळयात आधीपासून एक वाणिज्य कनेक्शन असल्याने दुस-या दुकान गाळयात वाणिज्य कनेक्शन देता येत नाही या कारणावरुन तक्रारदारास वीज जोडणी देण्यात आलेली नाही तक्रारदाराचे असे कथन आहे की, दुकान गाळा क्र.१ मध्ये व्यवसाय करण्याच्या व्यवसायाशी किंवा त्या व्यवसायाशी काही संबंध नसून दोन्ही बाबी स्वतंत्र आहेत. त्यामुळे वि.प. कंपनीच्या अधिका-यांचे म्हणणे की दुकान गाळा क्रमांक १ मधील असलेल्या वाणिज्य विज जोडणी मधून लोड वाढवून घ्यावा ,हे त्यास मान्य करता येत नाही. दुकान गाळा क्रमांक २ मध्ये उपलब्ध लघुदाब विज वाहिनी वरुन तक्रारदाराच्या दुकान गाळा क्रमांक २ मध्ये स्वतंत्र विद्युत पुरवठा करणेस म.विज वितरण कंपनीला कोणतीही अडचण नाही.

३) सदर प्रकरणी तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष मंडल कार्यालय, सांगली यांचेकडे तक्रार सादर केली असता त्याचा निकाल दिनांक ०८.१०.२०१८ रोजी लागून कक्षाने नविन कनेक्शन मागणी असलेल्या जागेची स्वतंत्र कागदपत्रे संबंधित कार्यालयास सादर केलेनंतर वाणिज्य कनेक्शन देणेबाबत नियमानुसार योग्य ती कारवाईकरावी असा आदेश दिला असता त्या आदेशाने तक्रारदाराचे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने प्रस्तुतची तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदाराच्या कथनानुसार त्याने शुध्द जल प्रकल्पा करिता मुद्रा योजने अंतर्गत कर्ज घेतलेले असून त्यावर मोठा आर्थिक बोजा आहे व कनेक्शन अभावी त्याचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. सबब त्यास ३० दिवसाचे आत वाणिज्य कनेक्शन जोडून देण्याचा आदेश व्हावा अशी मागणी केलेली आहे.

**वि. प. भूमिका**

४) प्रस्तुत प्रकरणाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर वि.प. विज वितरण कंपनी चे कार्यकरी अभियंता शहर विभाग, सांगली यांचे मार्फत हजर होऊन आपले लेखी म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या कथनानुसार तक्रारदाराने सि.स.क्र. २८०/A जुना बुधगांव रोड वखारभाग सांगली या ठिकाणी व्यापारी वापराकरिता नविन विद्युत जोडणी मिळावी म्हणून दिनांक १६.०३.२०१८ रोजी अर्ज दाखल केला आहे. तदनंतर नवीन विद्युत जोडणीच्या अनुषंगाने तांत्रिक सुसय्यता उपलब्धतेच्या पडताळणी करिता सविस्तर स्थळ पाहणी करणेत आली. स्थळ पाहणीनुसार खालील बाबी निदर्शनास आल्या. जरी अर्जदाराने मागणी अर्जात सदरची मिळकत ही स्वत:च्या मालकीची आहे असे नमूद केले तरी मालमत्ता पत्रकात त्याची मालकी दिसून येत नाही. सदरची जागा सौ.पुष्पा रमेश पवार यांच्या मालकीची असून त्यांचे संमतीपत्र मागणी अर्जासोबत जोडले आहे. त्यामुळे तक्रारदारानी मागणी अर्जामध्ये सादर केलेली माहिती सदोष आहे. सबब दिनांक ०४.०४.२०१८ च्या पत्राने आपल्या नावाचा उतारा सादर करणे संबंधी तक्रारदारास सुचीत करण्यात आलेले आहे. त्या पाहणी दरम्यान सदर मिळकतीमध्ये सौ. पुष्पा रमेश पवार यांच्या नावे ग्राहक क्र. २७९९४०४३५७५१ अन्वये व्यापारी वापराकरिता ३ फेज विद्युत पुरवठा चालू असलेचे दिसून आले व त्याच जागेत तक्रारदाराने व्यापारी वापराकरिता नविन विद्युत जोडणी मागणी केली आहे. सदर मिळकतीची पुन्हा दिनांक ०२.०८.२०१८ रोजी सहाय्यक अभियंता शाखा, वखार भाग कार्यालय सांगली व अतिरिक्त कार्यकारी अभियंता , उपाविभाग म.रा.वि.वि.कं.मर्या. मध्य उपविभाग सांगली शहर यानी प्रत्यक्ष भेट देऊन स्थळ पाहणी केली असता सदर

सि.स.क्र. २८०/A येथील इमारतीमध्ये तळ मजल्यावर दोन गाळे असून त्यापैकी एका गाळयात सौ. पुष्पा रमेश पवार यांच्या नावे व्यापारी वापराकरिता वर नमूद ग्राहक क्रमांकाने ३ फेज विद्युत जोडणीचा विद्युत पुरवठा चालू असल्याचे आढळून आले व त्याच जागेतील दुस-या गाळयात तक्रारदाराने व्यापारी वापराकरिता नविन विद्युत जोडणी मागणी केलेचे दिसून आले, सदर दोन्ही गाळयाचा मिळकत क्रमांक २८०/A हा एकच असल्याचे तक्रारदाराचे वडील श्री रमेश पोवार यांनी मान्य घेतली आहे. एकच जागेमध्ये व्यापारी वापराकरिता वीज जोडणी चालू असताना त्याच जागेत त्याच वापराकरिता नविन विद्युत जोडणी देता येवू शकत नाही कारण म.वि.कंपनीच्या महसूलावर परिणाम होतो तसेच विद्युत पुरवठा संहिता व पुरवठयाच्या इतर अटी विनियम २००५ मधील परिच्छेद क्र. २.२.५ अन्वये नविन विद्युत जोडणी तक्रारदारांना देण्यात आली नाही.

५) प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी दिनांक २६.०२.२०१९ रोजी व त्यानंतर दिनांक ०१.०३.२०१९ रोजी घेण्यात आली. सुनावणी दरम्यान तक्रारदारातर्फे प्रतिनिधी श्री मुकुंद माळी तर वि.प. विज वितरण कंपनी तर्फे श्री प्रकाश सुर्यवंशी , अतिरिक्त कार्यकारी अभियंता हजर होते. सुनावणी दरम्यान श्री माळी यांनी ज्या ठिकाणी वाणिज्य विद्युत जोडणी सुरु आहे तो दुकान गाळा क्र.१ व ज्या ठिकाणी नविन विज पुरवठा मागणी केला आहे तो दुकान गाळा क्र.२ हया दोन वेगवेगळया मिळकती असून दुकान गाळा हा तक्रारदाराची आई सौ. पुष्पा रमेश पवार यांच्या मालकीचा असून दुकान गाळा क्र.२ हा सौ. पुष्पा रमेश पवार यांनी तक्रारदारास व्यवसाय करण्याकरिता १० वर्षाच्या कराराने दिला आहे व हया मिळकती वेगवेगळया असलेचे प्रतिपादन केले आहे. या विधानाच्या पुष्टर्थ सदर मिळकतीची छायांचित्रे व इतर संबंधित कागदपत्रे हजर करण्याकरिता मंचाने त्यांच्या विनंती वरुन आज पर्यन्त मुदत दिली होती. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारदारातर्फे प्रतिनिधी श्री मुकुंद माळी यांनी पूर्ण इमारतीचे स्वतंत्र दुकानगाळे दाखवणारे छायांचित्र, महानगरपालीका सांगली यांनी स्वतंत्र व्यवसाय करण्यासाठी जारी केलेली अनुज्ञाची प्रत, सदर व्यवसाय चालू करण्याकरिता जारी करण्यात आलेला ना हरकत दाखला, जिल्हा उद्योग केंद्र सांगली यांनी तक्रारदारास मंजूर केलेल्या बीज भांडवल कर्ज मंजूरीचे प्रत्र तसेच त्या अनुषंगाने कॅनरा बॅक सांगली यांच्या मंजूरीच्या पत्राची प्रत, उद्योग आधार नोंदणी दाखला दाखल केलेला आहे. सदर कागदपत्राच्या आधारे श्री माळी यांनी दोन्ही मिळकती स्वतंत्र असल्याचे सांगितले तर वि.वि.कंपनीने जरी मिळकती मध्ये वेगवेगळे दुकानगाळे असले तरी सदर मुळ मिळकत एकच असल्याने वि.पु. विनियम २००५/ २.२.५ अन्वये त्याच वापराकरिता नव्याने विज पुरवठा देता येत नाही. ही दुकानगाळे हे वेगवेगळी मिळकती होत नाही हे शाबित होत नाही. म्हणून तक्रारदाराची मागणी मंजूर करता येत नाही असे प्रतिपादन केले .

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

६) आमच्या निष्कर्षाकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराची नविन वीज जोडणीची मागणी मंजूर होण्यास पात्र आहे काय? | होय |
| २ | अंतिम आदेश? | खालील प्रमाणे |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

**कारणमिमांसा**

७) **मुद्दा क्रमांक १ व २ :-** प्रस्तुत प्रकरणातील सर्व तथ्य (Facts) हया उभयपक्षी मान्य असल्याने आम्ही त्यांचा पुर्नउच्चार करणे टाळत आहेत. तक्रारदारातर्फे आज रोजी सि.स.कं. २८०/A हया मिळकतीवर उभ्या असलेल्या संपूर्ण ईमारतीचे जे छायांचित्र दाखल करण्यात आलेले आहे त्या चित्रा वरुन एक गोष्ट स्पष्टपणे दिसून येते की, सदर ईमारतीच्या तळ मजल्यावर तीन दुकान गाळे असून पहिल्या दोन गाळया मधून वाहनांच्या दुरुस्तीबाबत कामी व्यवसाय चालत असून तिस-या दुकानगाळयात तक्रारदाराचा शुध्द पेय जल व्यवसाय चालू असल्याचे दिसून येते. त्या दुकान गाळयास लागून वर जाण्याकरिता जिना असल्याचे दिसून येते. सदर तिन्ही गाळे बांधीव असून ते भिंती उभारुन वेगवेगळे बांधलेले दिसून येत असून प्रत्येक दुकान गाळयाला स्वतंत्र असे प्रवेशद्वार आहे. वास्तविक ते तिन्ही दुकान गाळे व्यावसायीक वापराकरिता बांधले असल्याचे दिसते . वाहनांच्या दुरुस्तीच्या बाबत वापरात असलेचे दुकान गाळे त्या इमारतीच्या मालक सौ. पुष्पा पवार यांच्या ताब्यात असून त्यांच्या नावे सदर दुकान गाळे क्र. १ वापर वाणिज्य वीज जोडणी असल्याने उभयपक्षी मान्य आहे. दुकान गाळा क्र. ३ जो तक्रारदाराच्या ताब्यात आहे. तो दुकान गाळा करारपत्राने १० वर्ष कालावधी करीता सदर इमारतीचे मालकानी जी तक्रारदाराची आई देखील आहे. तीने वापरण्यास दिलेला आहे याचा अर्थ तक्रारदार व इमारतीचे मालक हयांच्यामध्ये सदर दुकान गाळयाबाबत leave & License या स्वरुपाचा व्यवहार झालेला आहे.हे जरी असले तरी तिन्ही दुकान गाळे सामायिक (Common) मानले जाऊ शकत नाहीत. विज वितरण कंपनीच्या कथनानुसार जो पर्यन्त सदर मिळकतीच्या अभिलेखामध्ये सदर तीन दुकान गाळयांची वेगवेगळी नोंदणी होत नाही तो पर्यन्त त्यास Common premises असे संबोधावे लागेल आणि वि.वि. संहिता च्या २.२.५ अन्वये एकाच उद्देशाकरिता एकाच Common premises मध्ये त्याचा वर्गवारीचे दोन स्वतंत्र विज पुरवठा करता येत नाही. म्हणून तक्रारदाराची मागणी मान्य करता येत नाही.

८) "Conditions of supply based on Maharashtra Electricity Regulation Commission (Electricity Supply code and other conditions of supply) Regulations 2005 च्या कलम २.२.५ मध्ये खालील प्रमाणे प्रावधान आहे.

९) "MSEDCL shall not permit any applied /consumer to have two or more independent power supply connections for an identical purpose <u>in one common premises</u>. " (Emphasis supplied) . त्यातील पुढील तरतूद आपल्या हया प्रकरणाशी संबंधीत नसल्यामुळे आम्ही ती हया ठिकाणी नमूद करत नाही. सदर वितरण संहिता किंवा विनियम हया मध्ये "One common Premises " त्याची व्याख्या केलेली नाही. त्यामुळे common Premises हया शब्दाचा अर्थ शोधण्याकरिता शब्दकोषाचा संदर्भ घेणे जरुरी आहे. कारण तो अर्थ हया प्रकरणांत कळीचा मुद्दा (Crux of the matter ) आहे. Oxford Dictionary मध्ये "Common" हया शब्दाची व्याख्या "सामाईक " अशी केलेली आहे. Oxford चा शब्द कोष हा विश्व मान्य असल्यामुळे त्याचा संदर्भ घेणे योग्य राहिल असा हया मंचाचा निष्कर्ष आहे. त्या व्याखेमुळे, तक्रारदारांनी हजर केलेल्या छाया चित्रांवरुन दिसणारी , दुकान गाळयांची परिस्थिती त्यामुळे सदर दुकान गाळे सामाईक आहेत असे म्हणता येत नाही ,ते तिन्ही दुकान गाळे, स्वतंत्र आहेत हे स्पष्ट दिसते.

त्याप्रमाणे दुकान गाळयांचा स्वतंत्र भु-अभिलेख (City Survey Number etc.) आवश्यक आहे हे विज वितरण कंपनीचे कथन कायद्यानुसार नाही असे हया मंचाचे मत आहे. सदर दुकान गाळे, सामाईक वापराचे अजिबात नाहीत. त्यामुळे वि.वि.संहिताच्या कलम २.२.५ चा बाध प्रस्तुत प्रकरणांत येवू शकत नाही. असा हया मंचाचा निष्कर्ष आहे. सबब, तक्रारदार , त्यांचे कब्जात असणा-या दुकान गाळात स्वतंत्र विज जोडणी घेण्यास पात्र आहे असा हया मंचाचा निष्कर्ष आहे. सबब मुद्दा क्रमांक १ चे उत्तर आम्ही होकारार्थी दिलेले आहे.

१०) तक्रारदाराने विज जोडणी करण्याकरिता आवश्यक असणारी इतर कागदपत्रे जोडलेली नाहीत असे विज वितरण कंपनीचे म्हणणे नाही. त्यांचा आक्षेप फक्त वर नमूद केल्या प्रमाणे आहे. त्या आक्षेपाचा आम्ही वरील प्रमाणे परामर्श घेतला असून तो फेटाळलेला आहे. सबब तक्रारदारास नविन विज पुरवठा त्यांच्या मागणी प्रमाणे मिळणेस तो पात्र आहे. सबब, सदर तक्रार मंजूर करावी लागेल असा हया मंचाचा निष्कर्ष आहे. म्हणून आम्ही खालील आदेश पारित करीत आहोत.

## आदेश

१) तक्रार अर्ज मंजूर करण्यात येत आहेत.

२) तक्रारदारांचा विज जोडणीच्या मागणीचा दिनांक १६.०३.२०१८ चा अर्ज मंजूर करुन त्यास मागणी प्रमाणे विज भार देणारी नविन विज जोडणी, सि.स.क्र.२८०/अ या इमारतील , तक्रारदारांचे ताब्यांतील दुकानगाळा क्र.३ मध्ये वाणिज्य वापरा करीता नविन विज जोडणी हया आदेशांचे तारखेपासून १ महिन्याचे आंत द्यावी असा आदेश पारीत करण्यात येतो.

३) आदेशाची पुर्तता झालेचे , हया मंचास पुर्तते पासून आठ दिवसांत कळवावे. असा आदेश विज वितरण कंपनीस देण्यात येतो.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. पुजारी) | (एन.के. ताडे) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

केस नं. ५३/२०१८-१९ बाबत माझे स्वतंत्र मत देत आहे.
ते सोबत जोडले आहे.

(एन्. के. ताडे.)

मी एन.के.ताडे सदस्य,सचिव वरील निर्णयाशी मी सहमत नसून माझे स्वतंत्र मत खालील प्रमाणे देत आहे. तो या निकालाचा भाग समजण्यात यावा.

तक्रारदार यांना एकाच इमारतीमध्ये पूर्वीचे स्वतंत्र घरगुती, व व्यावसायिक कनेक्शन दिले असताना , त्याच इमारतीमध्ये वेगळा स्वतंत्र गाळयाचा भूमिलेख नसताना फक्त छायाचित्रा वरुन वेगळा गाळा दिसतो म्हणून त्या ठिकाणी स्वतंत्र विज पुरवठा करता येणार नाही. Conditions of supply च्या कलम २.२.५ मधील "MSEDCL shall not permit any applied /consumer to have two or more independent power supply connections for an identical purpose in one common premises. " या मधील मंचाने फक्त Common हया शब्दाची व्याख्या oxford Dictionary वरुन "सामाईक" केलेली आहे. परंतु त्यापुढे असलेल्या "**premises**" या शब्दाचा विचार केलेला नाही. मंचाने छायांचित्रावरुन गाळे स्वतंत्र आहेत व सामाईक आहेत असे म्हणता येणार नाही असे म्हटले आहे. परंतु हे सर्व गाळे एकाच सामाईक इमारतीत आहेत (Common premises) हे नमूद केले नाही. त्यामुळे गाळयांची वेगवेगळी नोंदणी होईपर्यन्त त्यांना स्वतंत्र विज पुरवठा करणे मान्य करता येणार नाही. सबब वरील तक्रार मंचाने फेटाळणे योग्य होईल

दिनांक : २७.०३.२०१९

( एन.के. ताडे)
सदस्य सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच कोल्हापूर

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण